# ज्ञान प्रबोधिनी - राष्ट्रीय एकात्मता

## नागरी वस्ती विभाग

### (वार्षिक वृत्त - एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ )

**प्रास्ताविक :** पुण्यातील २० वस्त्यांमध्ये संपर्क भेटीतून लोक संवाद झाला. वस्त्यांमधील कुटुंबातील सर्व घटकांचे विविध माध्यमातून आरोग्य, शिक्षण, सामाजिक जाणीव व राष्ट्रीय एकात्मता इ. विषयांवर प्रबोधन, प्रशिक्षण केले गेले. १५ ते २५ वयोगटातील युवक युवतीचे सर्वेक्षण करून त्यांच्या अपेक्षेनुसार वस्तीमध्ये व ज्ञान प्रबोधिनी संस्थेमध्ये अनेक कार्यक्रम घेतले गेले. यामध्ये मुख्यतः व्यक्तिगुण व नेतृत्व गुण विकसनास पूरक ठरणाऱ्या उपक्रमांचा समावेश होता. गेली ५ वर्षे संपर्कात असलेल्या ८ वी ते १२ वी मधील ४६ मुलींचे व्यक्तिमत्व विकास हेतूने प्रथमच **"निवासी विद्याव्रत संस्कार"** शिबीर झाले. यावर्षी विविध वस्त्यांमधून प्रबोधिनीमध्ये २१५ नवीन व्यक्ती भेट देऊन गेल्या.

**नेतृत्व विकसन संदर्भात - कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर :** दि. १ ते ३ एप्रिल २०१६ या काळात एकूण १५ युवतींचे प्रशिक्षण शिबीर झाले. वक्तृत्व कौशल्य शिकवणे हे मुख्य उद्दिष्ट होते. गटचर्चा, वादविवाद, भाषण करणे इ. माध्यमातून सुधाताई रहाणे यांनी सत्रे घेतली. प्रबोधिनीची तत्वसप्तक व नेतृत्व संवर्धन संकल्पना यांचा परिचय करून दिला. कृतीसत्रे म्हणून वस्तीभेटी,



**पाटील इस्टेट महिला बैठक**





**कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग**

दल घेणे प्रशिक्षण व विद्याव्रत शिबीर नियोजन ही सत्रे झाली. तसेच प्रत्येकीने पुढील वर्षातील स्वतःच्या कामाचे नियोजन केले.



**निवासी विद्याव्रत संस्कार शिबीर** : नागरी वस्ती तर्फे वस्तीतील मुलींचे पहिलेच विद्याव्रत शिबीर आयोजित केले गेले. ज्ञान प्रबोधिनीच्या वास्तूमध्ये निरनिराळ्या वस्तीमधून आलेल्या किशोरींचे विद्याव्रत शिबिर **१६ ते २० एप्रिल २०१६ या कालावधीत झाले .**शिबिरात काशीवाडी, दांडेकर वस्ती , सातचाळ, शाहू वस्ती, लक्ष्मी नगर, हनुमान नगर, कसबा पेठ, जोशीवाडा व प्रबोधन परिसर अशा विविध वस्त्यांमधून एकूण ४१ किशोरी  व ५ कार्यकर्त्या सहभागी झाल्या.



नेहमीच्या **विद्याव्रत सत्रांबरोबर** पुढील विविध सत्रांचा मुलींनी अनुभव घेतला

**वाचन सत्रे** : छात्र प्रबोधनाचा अंक, इंग्रजी गोष्टी, इंग्रजी शब्दांचे उच्चार कसे करावेत हे घेतले.

**गट कार्य** : भेळ बनवणे, दिलेल्या विषयावर नाट्य, नृत्य, ठरवलेल्या ठिकाणी (पोलीस चौकी, दुध डेअरी, योगेश हॉस्पिटल, चष्म्याचे दुकान इ. ) जाऊन माहिती काढून आणणे, प्रबोधिनीतल्या विभागांची माहिती काढून आणणे.



**कला सत्र** : क्विलिंग - निरनिराळी कर्ण भूषणे बनवली.

**खेळ व इतर उपक्रम** : पर्वती दर्शन , तारांगण भेट 'जय गंगाजल' चित्रपट व चर्चा

**शिबिराचा दिनक्रम** : चार दिवस असलेल्या या शिबिराचा साधारणपणे एक दिनक्रम होता. दिवसाची सुरुवात उपासनेने होत होती. उपासनेनंतर सूर्यनमस्कार, व्यायाम, योगासने



असे व्यायामाचे प्रकार घेतले गेले. पुढचे सत्र विद्याव्रत पोथी वाचन सरावाचे होते. पूर्ण शिबीर मिळून सहा विद्याव्रत व्याख्याने होती. ही व्याख्याने शक्यतो सकाळच्या सत्रात होती. भोजन व मोकळिकीनंतर गटकार्याचे सत्र होते. संध्याकाळच्या सत्रात दलाचे खेळ व खेळासारखे इतर उपक्रम योजले होते. दैनंदिनी लिहून दिवसाची समाप्ती होत होती.

**विद्याव्रत संस्कार : दि. २० रोजी विद्याव्रत संस्कार झाला.** आचार्या वीणाताई बेडेकर-कदम यांच्या हस्ते ४६ मुलींनी व्रत चिन्ह स्वीकारले. मा.कार्यवाह सुभाषरावांनी मुलींना भावी आयुष्यासाठी मार्गदर्शन केले. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, लो. टिळक अशा थोर व्यक्तींची उदाहरणे देत संकल्प पूर्ण करण्यासाठी काय करावे हे सांगितले. तसेच पालकांना मुलींना पाठींबा द्यायला हवा असे सुचवले

**शारदोत्सव २०१६ : 'सर्व मंगल मांगल्ये "** ह्या श्लोकाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यानंतर प्रबोधिनीचे "प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया' हे पद्य सर्व सहभागी किशोरी युवतींनी म्हणले. मेळावा प्रमुख श्रद्धा गिरी हिने प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय करून दिला. शारदोत्सव मेळाव्याचे महत्व सांगितले. मा. हर्षा ताईनी निवडक मनाच्या श्लोकांचा व काही सुविचारांचा अर्थ सांगितला. समर्थ व्यक्तिमत्व बनवण्यासाठी आपलाल्या काय करायचे आहे ते ठरवून त्यप्रमाणे आपल्या आयुष्याचे नियोजन केले पाहिजे. असे त्या म्हणाल्या. **मनोबलाची उपासना** या सत्रात डॉक्टर अलकाताई निरंतर आणि अंजलीताई भिडे यांनी **सोशल मिडीयाचा वापर** या विषयावर एक छोटसे नाटुकले सादर केले.



**विद्याव्रत संस्कार - हुतात्मा राजगुरू विद्यालय**







**शारदोत्सव २०१६**

मुलींनी सोशल मिडिया वापरताना काय दक्षता घेतली पाहिजे यावर अलकाताई बोलल्या. त्यानंतर ‘**मैत्री**’ या विषयावर चर्चा झाली. पुढील सत्रात तीन गट करून त्यांचे **खेळ** घेतले. **स्वसंरक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या** तायक्वांदो आणि लाठी-काठी या **खेळांची प्रात्यक्षिके** दाखवण्यात आली. मेळाव्यातल्या शेवटच्या समारोप सत्रात (संकल्प सत्र) **बक्षिस वितरण** मा. पाहुण्यांकडून व इतर मान्यवरांकडून केले. यानंतर शाहीर मा. संगीता मावळे यांनी आपले व्यक्तिमत्व कसे फुलवायचे हे सांगितले. त्यांनी राजमाता जिजाबाईच्या आई **म्हाळसाबाईची गोष्ट पोवाड्यातून** मांडली. ज्याकाळी प्रत्येकाला मुलगाच व्हावा असे वाटत असे अशा वेळी जिजाबाईच्या आई म्हाळसाबाई यांनी देवीकडे मला मुलगीच हवी असे मागणे मागितले. पोवाडा अतिशय रंगतदार झाला. मा. संगीताताईनी दुसरा एक पोवाडा सर्व मुलींना सहभागी करून म्हणला. मेळाव्यामध्ये ६९ किशोरी/युवती, १५ कार्यकर्त्या, २१ अन्य वक्ते व सदस्य असे एकूण १०५ लोक सहभागी झाले.

**क्रीडा संस्कार सराव शिबिरे : पूर्वतयारी :- कार्यकर्ता गटाने** प्रथमच क्रीडा संस्कार शिबीर घ्यायचे ठरवले क्रीडा संस्कार शिबीर म्हणजे काय त्यामध्ये काय करणार याची सविस्तर माहिती मुलींना देण्यासाठी पाच वस्त्यांमध्ये नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात शिबिरे घेतली. या शिबिरांमध्ये खेळ जास्त घेतले. मुलींची यादी बनवली. सातचाळ वसाहत येथून १५ किशोरी , कसबा येथून २२ किशोरी, दांडेकर वस्तीमधून ८ किशोरी व गोसावीवस्ती येथून २३ किशोरी, पाटील इस्टेट येथून २२ किशोरी अशी यादी तयार झाली. एकूण ९० किशोरी या शिबिरात







**क्रीडा संस्कार शिबीर - चेतना व्यायाम**



सहभांगी झाल्या. यासर्व ठिकाणी मैदानावर खेळण्यासारखे खो-खो, कबड्डी, लंगडी, डुक्कर मुसंडी, वाघ शेळी असे विविध खेळ घेण्यात आले. खेळांबरोबर हस्तकलेचेही काही प्रकार उदा. कागदी फुले बनवणे घेण्यात आले. **क्रीडा संस्कार शिबीर :** रविवार १३ नोव्हेंबर २०१६ रोजी ज्ञान प्रबोधिनीमध्ये सकाळी क्रीडा संस्कार शिबीर सुरु झाले .मेळाव्यामध्ये ४६ किशोरी, १५ कार्यकर्त्या असे एकूण ६१ लोक सहभागी झाले. चेतना व्यायाम, सूर्य नमस्कार, व्यायामाविषयी व्याख्यान व सांघिक खेळ असे शिबिराचे स्वरूप होते.

**तासिका शाळातील मुलांची ज्ञान प्रबोधिनीस भेट :** नागरी वस्ती व पालवी गट संयुक्त योजनेतून तासिका घेत असलेल्या दोन शाळांच्या मुलांची प्रशाला भेट झाली. दिनांक १४ फेब्रुवारी रोजी हुतात्मा राजगुरू प्रशालेतील २२ मुले व ३ शिक्षक प्रबोधिनी प्रशालेला भेट द्यायला आले होते. मुलांना प्रशालेतील ग्रंथालयाची माहिती दिली. (Reference Books ) कशासाठी वापरायची ते समजावून सांगितले. तिन्ही शास्त्र प्रयोगशाळा दाखवल्या. तेथली उपकरणे हाताळायला दिली. छात्र प्रबोधन अंक कसा वाचायचा ह्याची माहिती सुलभाताई कुलकर्णी यांनी दिली. नंतर धडपड प्रयोग शाळेत मुले गेली. प्रत्येकाने आपल्या नावातील पहिले अक्षर लाकडाच्या फळीवर रंध्याने कापून तयार केले व नवनिर्मितीचा आनंद लुटला. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. दिनांक २१ मार्च २०१७ रोजी विमलाबाई विद्यालयातील २० विद्यार्थी व २ शिक्षक प्रबोधिनी प्रशालेला भेट द्यायला आले होते. शाळेत आल्यवर प्रथम मुलांच्या अत्यंत आवडीचा विषय असलेल्या धडपड प्रयोग शाळेत जाऊन आपल्या नावातील पहिले अक्षर लाकडाच्या





धडपड प्रयोगशाळा





महिला बैठक

फळीवर रंध्याने कापून तयार केले. त्यानंतर अल्पोपहार झाला. नंतर जीवशास्त्र प्रयोगशाळा दाखवली. तेथली उपकरणे हाताळायला दिली. मुलांनी प्रयोगशाळेत जाऊन फुगे फुगवून कडी आरपार घालणे, शिट्टी बनवणे , पोपट व पिंजरा प्रयोग इ. प्रयोगांची माहिती करून घेऊन स्वतः प्रयोग केले. समारोपात मा. हर्षाताईनी ‘प्रबोधिनीत यायचे’ हे पद्य मुलांकडून म्हणून घेतले. त्यांनी मुलांनी प्रबोधिनीत आल्यापासून काय केले, काय काय बघितले अशा प्रकारे गप्पातून संवाद साधला. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.



**महिला उपक्रम : सावित्री दल - मेळावे** किशोरी युवती यांच्या बरोबरीने २०१६-१७ मध्ये महिलांचा मासिक उपक्रम सावित्री दल नावाने सुरु झाला. संपर्कातील किशोरी व युवतींच्या कुटुंबातील स्त्री सदस्यांशी संवाद केल्यावर त्यातील निवडक महिला कार्यक्रमाला यायला लागल्या. स्वयं विकासातून समाज परिवर्तन हे सावित्री दलाचे एकत्र जमण्याचे उद्दिष्ट ठरले.




डिसेंबर ते मार्च या कालावधीत ४ मेळावे झाले. त्यामध्ये एकूण १२४ महिला सहभागी झाल्या मेळाव्याचे स्वरूप प्रबोधिनी परिचय, विशेष व्याख्याने, विविध खेळ व गटचर्चा असे होते. व्याख्यानांमध्ये साधना सेठिया यांनी व्यक्तिगुण विकास हा विषय मांडला. डॉक्टर अलका निरंतर यांनी मनाचे आरोग्य, हाडांच्या समस्या - आहार व व्यायाम यावर चर्चा घेतली. भारती कामठे यांनी ग्राम विकासातील बचत गट व हिरकणी प्रकल्पाची माहिती सांगितली. सुजाता होनप यांनी विविध खेळांच्या माध्यमातून बुद्धीमत्ता विकास प्रक्रिया समजावून सांगितली.




वरील सर्व व्याख्यानांमधून महिलांना व्यक्तिमत्व विकासास पूरक माहिती मिळाली.

**युवक सन्मान मेळावा** - दिनांक १९ मार्च २०१७ रोजी ज्ञान प्रबोधिनी येथे निरनिरळ्या वस्तीमधील युवकांचा मेळावा झाला. ज्ञान प्रबोधिनीच्या नागरी वस्ती विकास विभाग व युवक विभाग कार्यकर्ते आणि भारती विद्यापीठातून MSW करत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून हा मेळावा संपन्न झाला. निरनिराळ्या १७ ठिकाणांहून एकूण ४३ युवक मेळाव्यात सहभागी झाले होते व वरील सर्वजण मिळून ७३ संख्या होती. नेतृत्व संवर्धन विभागाचे प्रमुख महेंद्रभाई सेठिया यांनी मुलांचे गट करून विषय देऊन **'परिचय सत्र"** घेतले. 'मित्र' या संस्थेचे मा. अनंतराव अभंग **यांनी 'उद्योजकता' व 'रोजगार संधी'** याची माहिती, **श्री. सुनिल गोखले यांनी "कोळसा कसा बनतो"** ते सांगितले. हा कोळसा वापरून निर्धूर चुलीचे प्रात्यक्षिक व याच विषयावरील एक फिल्म ही दाखवली. MSW विद्यार्थ्यांनी तरुण आणि व्यसने यावर **एक पथनाट्य** सादर केले. डॉक्टर अलकाताई निरंतर व विशाखाताई यांनी **'तरुणाईची आव्हाने'** या विषयावर व्याख्यान दिले. प्रत्येक युवकाला **स्व-बद्दल** विचार करून व्यक्त व्हायला प्रवृत्त केले व व्यक्तिमत्त्व विकासाबद्दल जागृत केले. तुषार सरांनी युवकांशी विविध भावभावना व गरजा याबाबत बोलणे केले. वयात येत असताना होणाऱ्या बदलांमुळे भावनांची अभिव्यक्ती उदा. राग, चिडचिड , आकर्षण इ.चे व्यवस्थापन कसे करायचे हे त्यांनी सांगितले **लैंगिक दुर्वर्तन व त्याबाबतचे कायदे** याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. **'माहिती सत्रामध्ये ' -** प्रबंध 'शोध युवा मनाचा' या अहवालाची मांडणी केली. **'ओम तत्सत श्रीनारायण तू '** या प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.










नागरी वस्ती विभाग ( २०१६-१७) उपक्रम विषय तक्ता व सहभागी संख्या

| | |
|---|---|
| <u>किशोर –किशोरी - निरंतर नेतृत्वगुण विकास कार्यक्रम - १४६०</u> | |
| **सर्व्हे** - गुणपत्रिका माहिती संकलन काशीवाडी, वडारवाडी, दांडेकर वस्ती, सातचाळ वसाहत | ६७ |
| **उन्हाळी शिबिरे व मेळावा ( एप्रिल - जून )** : सातचाळ वसाहत गणेश नगर, वडारवस्ती कर्वेनगर, दांडेकरवस्ती, कसबा पेठ, गोसावी वस्ती, शाहू वस्ती, पाटील इस्टेट , हनुमान नगर | १६० |
| **क्रीडा संस्कार सराव शिबिरे व प्रबोधिनीतील शिबीर** | १५१ |
| **निवासी विद्याव्रत शिबीर प्रबोधिनी (१६ ते २० एप्रिल २०१६)** | ४६ |
| **साप्ताहिक दले** - ५ वस्त्या - सातचाळ, किशोर काशीवाडी , वडारवाडी,, दांडेकर वस्ती, कसबा पेठ, पाटील इस्टेट | ५५७ |
| **स्फूर्तीदल मेळावा** – ज्ञान प्रबोधिनीतील | ७० |
| **तासिका शाळा (५०) व त्यांची ज्ञान प्रबोधिनी भेट (४७)** हुतात्मा राजगुरू विद्यालय, विमलाबाई लुंकड | ९७ |
| **किशोर दल** काशीवाडी, दांडेकर वस्ती - प्रबोधिनी धडपड प्रयोगशाळा भेट | ३० |
| **सर्वेक्षण** - सोशल मिडियाचे परिणाम **( ९ वी व १० वी विद्यार्थी)** | ५७ |
| **सेवा योजना - शैक्षणिक साहित्य वाटप ( सात वस्त्या)** | १२० |
| **सांस्कृतिक कार्यक्रम :** विविध गुणदर्शन कार्यक्रम, नागपंचमी, गुरु पोर्णिमा, हरितालिका पूजन, ख्रिसमस | १०५ |
| युवक युवती व्यक्तीगुण व नेतृत्वगुण विकास - १००९ | |
| **युवक युवती सर्वेक्षण** :पाटील इस्टेट १५ ते २५ या वयोगटातील सर्व्हे<br>८ ते १२ या वयोगटातील सर्व्हे किशोर/किशोरी | ३७२<br>१६४ |
| **युवक सर्वेक्षण -** भटके विमुक्त युवकांच्या समस्या (६१) अन्य युवक समस्या (१११) | १७२ |
| **२२ युवक मंडळांचे सर्वेक्षण** (तरुण मंडळातील नेतृत्व घडणीची प्रक्रिया ) - पदाधिकारी मुलाखती | १५० |
| **युवक सन्मान मेळावा -** १९ मार्च २०१७ **-** १७ ठिकाणाहून युवकांची प्रबोधिनीस भेट | ७३ |
| **युवक मेळावा - पाटील इस्टेट -** व्यक्तिमत्व विकास, स्वयं रोजगार , व्यसने व परिणाम | ४८ |
| **युवती कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर** - १ ते ३ एप्रिल, अभ्यास सराव शिबीर, मुक्ता दल | ६५ |
| **युवतींचे अनुभवलेले कार्यक्रम** - आळंदी - पुणे वारी ज्ञान प्रबोधिनीतील आषाढी एकादशी अभंग गायन, व गणेश प्रतिष्ठापनेत सहभाग , बर्ची व वाद्य पथकात सहभाग | १६ |
| **शारदोत्सव ९ ऑक्टोबर १६ खेळ** - स्पर्धा, सोशल मिडीयावर नाटूकल, स्त्री-शक्ती व्याख्यान - पोवाडा | १०५ |
| नागरीवस्ती अभ्यासगट कार्यकर्ते – वर्षभरातील उपक्रमातील सहभाग – नागरी वस्ती, ज्ञान प्रबोधीनीतील उपक्रम | २० |
| **महिला उपक्रम – सावित्री दल – ३११** | |
| महिला सर्वेक्षण ( वस्तीतील महिला) ६४ + मेळाव्यात सहभागी महिला २१ | ८५ |
| महिला मेळावा व बैठक | १२५ |
| एकट्या , विधवा, परित्यक्ता महिलांचे सर्वेक्षण | १०१ |
| एकूण | २७८० |

वरील उपक्रमात सक्रिय सहभागी झालेल्या विषय तज्ज्ञांचे व अर्थ सहाय्य करणाऱ्या देणगीदारांचे मनःपूर्वक आभार. असेच सहकार्य यापुढील काळातही मिळेल अशी अपेक्षा करतो. लोभ आहेच, वृद्धिंगत व्हावा हीच विनंती.

**संपर्क क्रमांक : हर्षा किर्वे : ९४०३८५२७७४, ०२०२४२०७२२१ Email :** <u>sspnvag@jnanaprabodhini.org</u>